# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**

**१०५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८/०२/२०२०**

**जिल्हा : अहमदनगर**

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०२/२०२० ते २७/०२/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९/०२/२०२० ते ०४/०३/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.८ | ३४.६ | ३३.६ | ३४.६ | ३१.८ | २९.८ | २९.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३४ | ३३ | ३२ | ३२ | ३२ |
| १६.१ | १८.३ | १७.५ | १७.९ | १५.५ | ११.५ | १०.९ | किमान तापमान (अं.से.) | १४ | १५ | १४ | १३ | १२ |
| स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ७८ | ६४ | ७४ | ६९ | ६८ | ७९ | ७७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | ४३ | ४२ | ४१ | ३८ |
| २५ | २५ | २३ | २९ | २३ | २० | १८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १७ | २० | २३ | २१ | २३ |
| ०.९ | ०.५ | ०.४ | १.६ | ०.६ | १.३ | २.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ६ | ९ | ८ | १० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | दिनांक ०१ मार्च ते ०४ मार्च पर्यंत आकाश अंशतः ढगाळ राहील. |
| सामान्य सल्ला | | शेतकऱ्यानी पिकावर कीटकनाशकाची , बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतःची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| संदेश | | ११० दिवसामध्ये सुर्यफुलाचे पीक तयार होते. सूर्यफुलाची पाने, देठ व फुलाची मागील बाजू पिवळी झाल्यानंतर पिकाची कापणी करावी. कणसे चांगली वाळवून नंतर माळणी करावी. |
| हरभरा | - | घाटे अळीच्या नियंत्रणासाठी २.५-३ मिली क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी . |
| कांदा | वाढ | कांदा पिकावर फुलकिडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. हे प्रमाण फेब्रुवारी-मार्च महिन्यापर्यंत वाढत राहते. त्यासाठी लेम्बडा सायहॅलोथ्रीन ५ % SC @ ६-१० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने साध्या हात पंपाने फवारावे. करपा रोगाचे प्रमाण दिसून आल्यास त्याचे नियंत्रणासाठी मॅन्कोझेब किंवा क्लोरोथॅलोनील २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली प्रमाणे वरील कीटकनाशकात मिसळून फवारणी करावी. |
| मका | उगवण | खोडकिडीच्या नियंत्रणासाठी उगवणीनंतर ८-१० दिवसांनी १५ मिली डायमेथोएट ३० टक्के प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रोपवाटीका | - | सूत्रकृमींच्या नियंत्रणासाठी रोपे तयार करताना २६ किलो कार्बोफ्युरॅन ३ जी प्रति एकर या प्रमाणात मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. |
| कलिंगड व खरबूज | लागवड | सध्या कलिंगड आणि खरबूज या पिकांची लागवड चालू झालेली आहे. या पिकात प्रामुख्याने फुलकिडे, मावा व पांढरी माशी या किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो व तसेच केवडा , भुरी, पानावरील ठिपके , मर आणि विषाणूजन्य रोगांमध्ये मोझॅक व बड नेक्रोसीस या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. कलिंगडाचे पीक दोन ते तीन पानांवर असताना फवारणी करावी. प्रथमत: थायोमेथोक्झाम ४ ग्रॅम अधिक मॅन्कोझेब २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी. तसेच या पिकांवर नाग अळीचाचा प्रादुर्भाव आढळून येतो. नाग अळी पानाच्या आत शिरून आतील भाग खाते. त्यामुळे पानावर नागमोडी रेषा तयार होतात. नागअळीच्या नियंत्रणासाठी ४ टक्के निंबोळी अर्क प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हातपंपाने फवारावे किंवा सदर फवार ण्या फुले येण्यापूर्वी कराव्यात. फुले आल्यानंतर शक्यतो नि ओनिकोटीनाइड्स ग्रुपमधील (उदा. ॲसीटामिप्रिड , एमिडाक्लोप्रीड व थायोमेथोक्झाम) सारखी औषधे फवारु नये. |
| सुर्यफुल | काढणी | ११० दिव सामध्ये पीक तयार होते. सूर्यफुलाची पाने , देठ व फुलाची मागील बाजू पिवळी झाल्यानंतर पिकाची कापणी करावी. कणसे चांगली वाळवून नंतर माळणी करावी. |
| चवळी (चारा) | वाढ | माव्याच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५ टक्के फवारावे. मावा जास्त प्रमाणात असेल तर १० मिली डायमेथोएट ३० टक्के प्रवाही प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. औषध |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | फवारल्यानंतर ७ दिवस जनावरांना हिरवा चारा घालू नये. |
| टोमॅटो | लागवड | सध्या बर्यारिचशा भागात उन्हाळी भागात टोमॅटोची लागवड सुरू झालेल ली आहे. टोमॅटो पिकात पर्णगुच्छ रोगाचा प्रसार पांढरी माशी मार्फत होतो आणि विषाणूजन्य ठिपक्यांचा मर रोग फुलकिड्यामार्फत होत असल्याने , या किडींचे नियंत्रण वेळीच करणे गरज असल्याने रोगग्रस्त झाडे दिसताच उपटून नायनाट करावा. टोमॅटोच्या पुनर्लागवडीनंतर १० दिवसांनी १० किलो फोरेट प्रतिहेक्टरी या प्रमाणात झाडाभोवती गोलाकार पद्धतीने टाकून झाकावे व पाणी द्यावे. गरजेनुसार फिप्रोनील ५ इसी १५ मिली अधिक मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कारबेन्डाझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी. फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रणासाठी थायामेथोक्साम १२.६ %+ लेम्बडा सायहॅलोथ्रीन ९.५ % ZC @ २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी. अधूनमधून ४ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| लसून घास | - | मावा या किडीचा व्यवस्थापनासाठी ५० ग्रॅम व्हर्टिसिलियम लेकॅनी प्रति १० लिटर पाण्यात मिसळून या जैविक किटकनाशकाची संध्याकाळी फवारणी करावी. |
| आंबा | - | तुडतुडे या किडीच्या नियंत्रणासाठी ५ मिली लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही किंवा १० मिली प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| चिकू | --- | बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी १० मिली प्रोफेनोफॉस ५० टक्के किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ई.सी. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ई.सी. प्रवाही प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २८/०२/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**